| MHKO050015892022 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र.१५८/२०२२</u>**<br>**<u>मधील निशाणी क्र.२५ वरील आदेश</u>**<br>**वंदना टेक्सटाईल्स विरुध्द शशिकांत नंदाई** |
|---|---|

प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दाखल केला असुन या अर्जाद्वारे विनंती केली आहे की, त्यांच्या विरुध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश सेट असाईड व्हावा व उलटतपास घेण्याची संधी प्रतिवादी यांना मिळावी.

२. सदर अर्जावर वादी यांनी म्हणणे दाखल केले आहे की, प्रतिवादी हे केवळ प्रकरण प्रलंबित ठेवण्याकरिता सदरचा अर्ज देत असुन सदर अर्जातील मजकुर हा वादी यांना मान्य व कबुल नाही. सदरचा अर्ज हेवी कॉस्ट करुन नामंजुर करण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

३. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले.

४. सदरचा दावा हा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरिता तसेच नैसर्गिक न्याय तत्वास अनुसरुन प्रतिवादी यांना वादी यांचा उलटतपास घेण्याची संधी देणे न्यायोचित होईल. परंतु प्रतिवादी यांनी जो विलंब केला आहे त्याकरिता कॉस्ट लावणे न्यायोचित होईल. करिता खालील आदेश पारित करीत आहे -

**<u>आदेश</u>**

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी वादी यांना रुपये २००/-(रुपये दोनशे फक्त) इतकी कॉस्ट दयावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MRUNMAYEE MUKUNDRAO CHOUDHARY
Date: 2025.03.04 17:55:48 +0530

ठिकाण - इचलकरंजी.
दिनांक - ०४/०३/२०२५

(एम.एम.चौधरी)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
इचलकरंजी